महाराष्ट्र शासन
औषध भांडार विभाग

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव

Jilhapeth, Govt. Hospital Campus, Jalgaon - 425001, M.S. (INDIA)

Telephone No. 0257- 2222916 Email- deangmcjalgaon@gmail.com

जा.क्र.शावैमजवरु/औभां/दरपत्रके/ 1454 /२३ दि. 02/०६/२०२३

## सदर औषधाचा पुरवठा ७ दिवसांत करावा लागेल

## OPEN NOTICE

अधिष्ठाता, शासकिय वैदयकिय महाविदयालय व रुग्णालय, जळगांव हे खालील नमूद औषधांच्या खरेदीकामी तातडीचे दरपत्रके मागवित आहेत. इच्छूक पूरवठादारांनी आपली दरपत्रके सिलबंद लिफाफयात या कार्यालयाच्या आवक शाखेत दिलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून मुदतीत सादर करावी.

| Sr. | Name of Medicine | Approx Qty |
|---|---|---|
| 1 | Rabies Antiserum Equine 1500IU/5ml Inj IM & SC | 1000 |
| 2 | Rabies Immunoglobulin Human 300 IU/ml Inj 2 ml | 100 |

| | | |
|---|---|---|
| 1 | दरपत्रके सिलबंद लिफाफयात या कार्यालयास पोहचतील या बेताने पाठविणे. | १. दि. 05 /06 /२०२३ सायं ५.३० वाजेपर्यंत<br>२. लिफाफयावरील वरील बाजूस " औषधांकरिताची दरपत्रके " असे नमूद करावे. |
| 2 | दरपत्रके उघडणे | दि. 06 / 06 /२०२३ रोजी दूपारी वाजता ( शक्य झाल्यास ) |

## अटी व शर्ती

१. औषधींचे दर हे प्रति नगामध्ये (**प्रति टॅब/कॅप्सूल/बॉटल/व्हायल/ॲम्पूल इत्यादी** ) नमूद करावे व औषधांसाठीचे दरपत्रकात दर्शविण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत तसेच औषधे लागू असतील तेथे WHO GMP/ GMP certified Company उत्पादित असावीत.

२. औषधांचे दर हे औषधी हया कार्यालयात पोहचविणे (F.O.R. Destination) तसेच सर्व करांसहित असावेत. सदर औषधी पोच करण्याचे ठिकाण हे मध्यवर्ती औषध भांडार, शासकिय वैदयकिय महाविदयालय व रुग्णालय, जळगांव हे राहिल.

३. दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवू नये.

४. तूलनात्मक दर प्राप्त करण्यासाठी कमीत कमी तीन दरपत्रके आवश्यक राहतील. दिलेल्या विनिर्दिष्टानूसार ( Specification ) असलेले कमीत कमी दर स्विकारण्यात येतील.

५. यशस्वी दरपत्रक धारकास औषधांचा गरजेनूसार पूरवठा आदेश देण्यात येईल.

६. पूरवठा आदेश दिल्यापासून ७ दिवसांच्या आत पूरवठा करावा लागेल.

७. औषधांची देयके ही CMP/NEFT/Cheque व्दारे करण्यात येईल.

८. दरपत्रक ग्राहय कालावधी हा दर स्विकृतीपासून सहा (६) महिन्यांचा राहिल.

९. दरपत्रक सिलबंद लिफाफयात सादर करावयाचे दस्ताऐवज ( Document ) :

अ) अन्न व औषध प्रशासन यांचेकडील परवाना.

ब) वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र.

क) पॅन (PAN) कार्ड.

ड) दरपत्रक मागणी पत्रातील अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र.

ई) प्रत्येक पूरवठादारास केवळ एक दरपत्रक सादर करता येईल. खरेदी प्राधिका-यासोबत हितसंबधाचा संघर्ष नसल्याबाबत तसेच एकल दरपत्रक देण्याबाबत हमीपत्र. ( सोबत नमूना प्रत जोडली आहे)

उक्त सर्व दस्ताऐवज वैध ( Valid ) तसेच सिलबंद दरपत्रक लिफाफा सादर करते वेळी लिफाफयात असणे आवश्यक आहे. सर्व दस्ताऐवज क्रमाने दरपत्रकासोबत संलग्नित करावे (Checklist Attached).

१०. अपवादात्मक परिस्थितीत उक्त कोणत्याही अटीत आवश्यकतेनूसार अंशतः बदल करणे, अथवा प्राप्त झालेले कोणतेही दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारणे / नाकारणे तसेच कोणत्याही स्तरावर खरेदीप्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमूख यांनी राखून ठेवलेले आहेत.

( डॉ गिरिष ठाकूर )
अधिष्ठाता
शासकिय वैदयकिय महाविदयालय
व रुग्णालय, जळगांव

## अत्यावश्यक दस्ताऐवज पडताळणी सुची ( Document Checklist )

दरपत्रक मागणी पत्रात अट क्रं ९ मध्ये नमूद करण्यात आलेले सर्व दस्ताऐवज दरपत्रक सिलबंद लिफाफयात खालील क्रमाने दरपत्रकासोबत सादर करण्यात आलेले आहे.

| दस्ताऐवज मागणी क्रं | दस्ताऐवजाचा तपशिल | पान नंबर |
|---|---|---|
| अ | अन्न व औषध प्रशासन यांचेकडील परवाना | |
| ब | वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र | |
| क | पॅन (PAN) कार्ड | |
| ड | दरपत्रक मागणी पत्रातील अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र | |
| ई | खरेदी प्राधिका-यासोबत हितसंबधाचा संघर्ष नसल्याबाबत तसेच एकल दरपत्रक देण्याबाबत हमीपत्र. | |

( पूरवठादाराची सही व शिक्का )

दरपत्रकधारकाचे लेटरहेड

दि.        /०६/२०२३

प्रति,
अधिष्ठाता,
शासकिय वैदयकिय महाविदयालय
व रुग्णालय, जळगांव.

विषय : दरपत्रक मागणी पत्रातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र सादर करणेबाबत......

संदर्भ : आपले दरपत्रक मागणी पत्र क्रं शावैमजवरु/औभां/दरपत्रके/        /२३ दि.        /०६/२०२३

महोदय,

संदर्भाकिंत दरपत्रक मागणी पत्रातील सर्व अटी व शर्ती मी वाचून दरपत्रक दरपत्रकप्रक्रियेसाठी सादर करीत आहे. सर्व अटी व शर्ती मान्य असून तद्संबधीचे हमीपत्र खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

## <u>हमीपत्र</u>

याव्दारे हमी देतो की, दरपत्रक मागणी पत्रात नमूद असलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असून, त्यांचे तंतोतंत पालन करण्यात येईल. तसेच दरपत्रक सिलबंद लिफाफयात सादर करण्यात आलेली सर्व माहिती, दस्ताऐवज व करारनामे इ. भविष्यात असत्य / बनावट /अवैध आढळून आल्यास, त्यास सर्वस्वी जबाबदारी आमची राहील. नियमानूसार होणा-या कार्यवाहीस मी / आम्ही पात्र असू. तद्संबधी माझी /आमची कुठलिही हरकत राहणार नाही. अशी याव्दारे हमी देत आहे.

अधिकृत व्यक्तिचे नाव, स्वाक्षरी
शिक्का आणि मोहर

**दरपत्रकधारकाचे लेटरहेड**

दि.        /०६/२०२३

प्रति,
अधिष्ठाता,
शासकिय वैदयकिय महाविदयालय
व रुग्णालय, जळगांव.

विषय : एकल दरपत्रक सादर करणेसंबधीचे हमीपत्र सादर करणेबाबत......
संदर्भ : आपले दरपत्रक मागणी पत्र क्रं शावैमजवरु/औभां/दरपत्रके/            /२३
दि.        /०६/२०२३

महोदय,

संदर्भाकिंत दरपत्रक मागणी पत्रानूसार मागणी करण्यात आलेले एकल दरपत्रक सादर करण्यासंबधीचे हमीपत्र खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

## हमीपत्र

याव्दारे हमी देतो की, दरपत्रक प्रक्रियेसाठी एकच दरपत्रक सादर करीत आहे. आमच्याच संस्थेशी निगडीत असलेल्या कूठल्याही व्यक्तीच्या नावे किंवा प्रत्यक्षपणे आम्हास लाभ होईल, अश्याप्रकारे दूसरे दरपत्रक दरपत्रक प्रक्रियेमध्ये सदर केलेले नाही. तसेच माझे / आमचे आपल्या कार्यालयातील खरेदी प्राधिका-यांशी कूठलेही हितसंबध नाही.

उक्त बाब भविष्यात असत्य / खोटी आढळून आल्यास, त्यास सर्वस्वी जबाबदारी आमची राहील. नियमानूसार होणा-या कार्यवाहीस मी / आम्ही पात्र असू. तद्संबधी माझी /आमची कुठलिही हरकत राहणार नाही. अशी याव्दारे हमी देत आहे.

अधिकृत व्यक्तिचे नाव, स्वाक्षरी
शिक्का आणि मोहर